**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जबाब**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवदेन करतो कीः

माझे नांवः– गुरुप्रसाद बाळकृष्ण नाईक

वयः– ५८ वर्षे, धंदाः–शेती,

राहणारः– कट्टा बाजारपेठ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ. डी.व्ही.गोवेकर यांचेतर्फे**

०१. दिनांक १५/०३/२०२१ रोजी राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक सिंधुदुर्ग यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी पंचनाम्यावर सही करण्याकरीता बोलावले होते. मी त्यांच्या सोबत कोठेही पंचनामा करण्यासाठी गेलो नव्हतो. माझ्या समक्ष पंचनामा झालेला नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे. ती मी ओळखतो. सहीस **नि.१७** देणेत आली. जप्ती पंचनाम्यातील मजकूराविषयी मी सांगू शकत नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास जप्ती पंचनाम्यातील मजकूराबाबत सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासा सारखे प्रश्न विचारणेची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०३/२०२१ रोजी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, सिंधुदुर्ग यांनी आपल्या कार्यालयात बोलावून गांव मौजे कोलगांव, आयटीआय जवळ सावंतवाडी–कुडाळ रस्त्यावर वंश जनरल स्टोअर्स परिसरात गोवा बनावटीच्या दारुची बेकायदेशीरपणे विकी करीत आहे आणि त्या कार्यवाहीसाठी मला पंच म्हणून बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार मी, निरीक्षक, इतर कर्मचारी आणि दुसरे पंच मोहन आरोसकर यांच्या समक्ष बातमी मिळालेल्या ठिकाणी छापा घातला होता. हे म्हणणे खरे नाही की, छापा टाकल्यानंतर आम्हांला वंश जनरल स्टोअर्सच्या मागील बाजूस एक इसम संशयास्पदरित्या वावरताना दिसून आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सदर इसमास येण्याचे कारण सांगून त्याला जागीच थांबवून त्याच्याकडे चौकशी केली असता सदर ठिकाणी मोकळया जागेत पॉलीथीनची पिशवी मिळून आली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सदर पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीच्या मॅकडॉल नं.१ व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ३० सिलबंद बाटल्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, या बाटल्यांबाबत त्या इसमाकडे चौकशी केली असता या बाटल्या त्याच्या असलेचे आमच्या समक्ष सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मिळून आलेल्या बाटल्यांमधून दोन बाटल्या प्रत्यंतरासाठी आमच्या सहीचे लेबल लावून बाजूला काढल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आमच्या समक्ष इसमाचे त्याचे नांव गांव विचारले असता त्याने

त्याचे नांव वसंत तुकाराम धुरी रा. कोलगांव, धुरीटेंब असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरीत बाटल्या आमच्या समक्ष जप्ती पंचनाम्याने जप्त करण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. जी. टोपले यांनी उलटतपास नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.08 18:06:26 +0530

(श्रीमती आर.जी.कुंभार)

दिनांकः– ०८/०७/२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.